गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात डीजे बंदी; पुण्याच्या धर्तीवर नियंत्रित परवानगीची मागणी

## नियमांचे पालन करताना डिजे व्यवसायिकांचे लाखोंचे नुकसान

**जालना । प्रतिनिधी**

गणेशोत्सव म्हटले की ढोल-ताशांचा निनाद, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि आधुनिक ध्वनिव्यवस्थेची साथ यामुळे उत्सवाचे वातावरण भारावून जाते. मात्र यंदाच्या गणेशोत्सवात जालना जिल्ह्यात डीजे आणि डॉल्बीच्या वापरावर प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेमुळे उत्सवाचा ध्वनीबाजू पूर्णपणे बदलला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह सिंधू तसेच लोकप्रतिनिधींनी डीजे न लावता गणेशोत्सवाच्या मिरवणुका काढण्याचे आवाहन केले. या आवाहनाला डीजे व्यावसायिकांनी सकारात्मक प्रतिसाद देत नियमांचे पालन करण्याची भूमिका घेतली आहे. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत यंदा डीजेमुक्त गणेशोत्सवासाठी पोलिस प्रशासनाने भूमिका घेतल्याचे वृत्त आहे. जालना, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, हिंगोली, लातूर, परभणी आणि धाराशिव या जिल्ह्यांत ध्वनीप्रदूषणाच्या नियमांच्या अंमलबजावणीवर भर देण्यात आला आहे. मात्र ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण ही एक बाजू असताना या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न दुसरीकडे उभा राहतो, अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर साउंड अॅण्ड लाईट संघटनेचे अध्यक्ष सुनील प्रकाश गायकवाड यांच्यासह डीजे व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे. जालना जिल्ह्यात यंदा डीजे न वाजविण्याच्या आवाहनाला व्यावसायिकांनी सहकार्य केले. गणेशमूर्तींच्या आगमनाच्या दिवशी शहरात डीजेचा दणदणाट दिसला नाही. उत्सवातील पारंपरिक वाद्यांना यामुळे अधिक वाव मिळाला. डीजे व्यावसायिकांनी प्रशासनाच्या निर्णयाला विरोध न करता ''नियमांचे पालन करू; मात्र आमच्या व्यवसायाच्या भवितव्याचाही विचार व्हावा'' अशी भूमिका घेतली आहे. गायकवाड यांच्या म्हणण्यानुसार, एका डीजे व्यवस्थेमागे चालक, सहाय्यक, तंत्रज्ञ, वाहतूक आणि साहित्य उभारणीशी संबंधित अशा साधारणपणे सात ते आठ जणांना रोजगार मिळतो. एका डीजे साउंड सेटअपमध्ये लाखो रुपयांची गुंतवणूक असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, विवाह




समारंभ आणि अन्य सार्वजनिक कार्यक्रम हे या व्यवसायासाठी महत्त्वाचे उत्पन्नाचे काळ असतात. ''प्रशासनाने केलेल्या आवाहनाचा आम्ही सन्मान केला आहे. ध्वनीप्रदूषणाचे नियम आणि न्यायालयीन आदेश यांचे उल्लंघन व्हावे, अशी आमची भूमिका नाही. मात्र संपूर्ण बंदीमुळे मोठी आर्थिक (पान २ वर)

# रेल्वे प्रश्नांवर खासदार डॉ. कल्याण काळे यांचा नांदेडमध्ये आक्रमक पाठपुरावा; मुकुंदवाडी गेट क्र. ५६ सह २० महत्त्वाच्या मागण्यांवर कालबद्ध कार्यवाहीची मागणी

**नांदेड - प्रतिनिधी**

जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांच्या सुविधा, रेल्वे सुरक्षा, नवीन रेल्वे सेवा, पायाभूत सुविधा, औद्योगिक मालवाहतूक तसेच प्रलंबित रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी नांदेड येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापकांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी रेल्वे विभागाकडे यापूर्वी करण्यात आलेल्या विविध मागण्यांचा आढावा घेत



प्रत्येक विषयावर तातडीने आणि कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्याचे निर्देशात्मक स्वरूपात आवाहन केले. खासदार डॉ. काळे यांनी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना दोन स्वतंत्र पत्रे प्रत्यक्ष सुपूर्द केली. यामध्ये मुकुंदवाडी येथील रेल्वे गेट क्र. ५६ येथे / उभारण्याच्या प्रलंबित प्रस्तावाला अंतिम मंजुरी देऊन प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा विषय विशेषत्वाने मांडण्यात आला. रेल्वे गेट वारंवार बंद होत असल्याने नागरिक, विद्यार्थी, कामगार, रुग्ण आणि व्यावसायिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे केवळ प्रशासकीय पत्रव्यवहार न करता या कामासाठी आवश्यक मंजुरी, निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष बांधकामाची निश्चित कालमर्यादा ठरवावी, अशी स्पष्ट भूमिका खासदार डॉ. काळे यांनी मांडली.

''नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि सुरक्षिततेशी संबंधित प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता येणार नाहीत. प्रस्ताव कोणत्या स्तरावर आहे यापेक्षा प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, हे महत्त्वाचे आहे,'' अशी भूमिका त्यांनी चर्चेदरम्यान स्पष्ट केली.

### रेल्वे सेवांच्या विस्तारासाठी ठोस पाठपुरावा

जालनाछत्रपती संभाजीनगर परिसरातील प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन वंदे भारत एक्स्प्रेस, जालनाछपरा रेल्वे सेवा, पूर्णापटना रेल्वे छत्रपती संभाजीनगरपर्यंत वाढविणे, अजंता एक्स्प्रेस मुंबईपर्यंत विस्तारित (पान २ वर)

# कायदा-सुव्यवस्था व महसूल सुरक्षेसाठी जालना जिल्हा प्रशासनाची धडक मोहीम

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांकडून ७२ हजार रुपयांचा दंड वसूल

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे तसेच अवैध प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री १२ या कालावधीत प्रादेशिक परिवहन विभाग, पोलीस प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि महसूल विभागाच्या गौण खनिज शाखेमार्फत संयुक्त व स्वतंत्रपणे ही मोहीम राबविण्यात आली.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने अंबड-सोलापूर-धुळे महामार्गावर विशेष तपासणी नाका उभारून २५ वाहनांची तपासणी केली. यामध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तीन वाहनांवर दंडात्मक कारवाई करून ७२ हजार रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला. तपासणीदरम्यान ओव्हरलोड वाहतूक, फिटनेस दाखला नसणे, वाहनचालक परवाना नसणे आणि रिफ्लेक्टर नसणे आदी उल्लंघने आढळून आली. ओव्हरलोड वाहतुकीमुळे महामार्गांचे होणारे नुकसान आणि अपघातांचा धोका लक्षात (पान २ वर)

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त रोहिलागड येथे विशेष प्रचार कार्यक्रम

## चित्रकला, निबंध स्पर्धेसह प्रभात फेरी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मार्गदर्शनाचे आयोजन

**अंबड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर आणि ग्रामपंचायत रोहिलागड यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर २०२६ रोजी रोहिलागड, ता. अंबड, जि. जालना येथे विशेष प्रचार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान तसेच स्वातंत्र्याच्या मूल्यांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विशेषतः विद्यार्थी व नागरिकांना मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाची माहिती देण्यात येणार आहे. या विशेष प्रचार कार्यक्रमांतर्गत चित्रकला व निबंध स्पर्धा, पुरस्कार वितरण, गीत व नाटकाच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम, प्रभात फेरी तसेच मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेच्या माध्यमातून इतिहास आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित विषयांवर आपले विचार व कलागुण व्यक्त करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

प्रभात फेरीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मुक्तिसंग्रामाच्या स्मृती जागृत करण्याबरोबरच राष्ट्रीय एकात्मता आणि देशभक्तीचा संदेश देण्यात येणार आहे. तसेच गीत व नाटकाच्या सांस्कृतिक कार्यक्रमातून मुक्तिसंग्रामातील घटनांचे आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांचा (पान २ वर)

# वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून आरोग्यसेवेचा उपक्रम

## नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक ८ मध्ये सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिर; २२१ नागरिकांची तपासणी

**जालना । प्रतिनिधी**

श्री गणेशोत्सवाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत वाढदिवसावरील अनावश्यक खर्चाला फाटा देत नागरिकांच्या आरोग्यासाठी सामाजिक उपक्रम राबविण्याचा आदर्श शिवसेनेचे नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी घालून दिला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक ८ मधील गवालेश्वर मंदिर, संग्रामनगर येथे सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



मिळाला असून तब्बल २२१ नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या. जालना शहर महानगरपालिका व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरामध्ये नागरिकांची हिमोग्लोबिन, कोलेस्ट्रॉल, थायरॉईड, लिपिड प्रोफाईल, रक्तदाब (), रक्तातील साखर (शुगर) आदी विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच वेळेवर आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

यावेळी बोलताना नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले म्हणाले की, वाढदिवस म्हणजे केवळ उत्सव किंवा अनावश्यक खर्च करण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी देण्याची संधी आहे. कार्यकर्त्याचे खरे कर्तव्य समाजोपयोगी उपक्रम राबविणे हे आहे. त्यामुळे वायफळ खर्च न करता प्रभागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबिर आयोजित केले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने गणरायाच्या चरणी जालना शहरासाठी सुख-समृद्धी आणि चांगल्या (पान २ वर)

# समान काम समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

## मागण्या मंजूर न केल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप

**अंबड - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट-क) संलग्न जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. समान कामासाठी समान वेतनाच्या मागणीसह अन्य प्रश्नांवर शासनाने निर्णय न घेतल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष



कल्याणराव टेपले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली आहे.मा. उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार वरिष्ठ वेतनवाढीचा प्रश्न सन २००६ पासून प्रलंबित असून, राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत सुमारे ३४ हजार कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने उच्च न्यायालयाकडे मागणी करण्यात आली होती. मागणी मंजूर करून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्यानंतरही शासनाकडून सुमारे २० महिने उलटूनही निर्णय झालेला नसल्याचे पत्रात नमूद आहे.

दरम्यान, आंदोलनाची कायदेशीर नोटीस शासन आणि उच्च न्यायालयाला देण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले असून न्यायालयीन व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनविषयक मागण्यांवर तसेच रिक्त पदे आणि वाढत्या कामाच्या ताणाच्या प्रश्नावर शासनाने (पान २ वर)

# प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी साकारला समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुतीचा देखावा

## प्रदर्शनात भूगोलातील १४० संकल्पना, ८४ प्रयोगांसह खगोलशास्त्राचीही प्रत्यक्ष अनुभूती

**जालना - प्रतिनिधी**

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे। शहाणे करून सोडावे सकळ जन।।' या समर्थ रामदास स्वामींच्या विचारांना कृतीची जोड देत प्रा. श्रीकांत चिंचखेडकर गेल्या २३ वर्षांपासून ज्ञानदान, शिक्षण, संस्कृती आणि समाजजागृतीच्या क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहेत. गणेशोत्सवाच्या माध्यमातून यंदाही त्यांनी जालना शहरातील हरी ओम नगरमधील निवासस्थानी 'श्री समर्थ रामदास स्वामी स्थापित अकरा मारुती' चा भव्य देखावा आणि विद्यार्थ्यांसाठी भूगोल-खगोलशास्त्रावर आधारित प्रात्यक्षिक प्रदर्शन साकारले



आहे. अकरा मारुतींच्या प्रतिकृतींच्या माध्यमातून शक्ती, बुद्धी, भक्ती, श्रद्धा, प्रयत्न आणि चिकाटीचा संदेश देण्यात आला आहे.

प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त क्षमता असते; ती ओळखून सातत्यपूर्ण प्रयत्नांनी विकसित करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी, हा या देखाव्यामागील मुख्य हेतू असल्याचे प्रा. चिंचखेडकर यांनी सांगितले. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे भूगोल विषयावरील १४० संकल्पना आणि ८४ प्रत्यक्ष प्रयोग व प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन. पृथ्वीची रचना, भूआकार, पर्वत, नद्या, समुद्र, हवामान, पर्यावरण आणि भारताचा भौगोलिक प्रदेश यांसारख्या संकल्पना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावून देण्यात आल्या आहेत. (पान २ वर)

# संपादकीय...

## डिजिटल आर्थिक क्रांतीतील नवे पर्व

अलीकडेच भारताने डिजिटल क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये एक एतिहासिक पाऊल टाकले. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते. या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात. आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात. विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# पान १ व ४ वरुन...

### जालन्यात डीजे...

गुंतवणूक केलेल्या व्यवसायिकांसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून काही नियंत्रित पर्याय प्रशासनाने उपलब्ध करून द्यावा,'' अशी अपेक्षा सुनील प्रकाश गायकवाड यांनी व्यक्त केली. त्यांच्या मते, डीजेचा अमर्याद आवाज आणि नियमबाह्य ध्वनिव्यवस्था यांना विरोध असला तरी नियमांचे पालन करणाऱ्या नियंत्रित ध्वनिव्यवस्थेला पूर्णपणे बंद करण्याऐवजी स्पष्ट निकष ठरविण्याचा पर्याय प्रशासन विचारात घेऊ शकते. पुण्याच्या धर्तीवर जालन्यातही नियंत्रित परवानगीचा पर्याय? यंदा पुणे पोलिसांनी गणेशोत्सवातील ध्वनिवर्धकांसाठी

काही निवडक दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी दिली आहे. १९, २०, २२, २३ आणि २५ सप्टेंबर या पाच दिवशी मध्यरात्रीपर्यंत ध्वनिवर्धक वापरण्यास सवलत असून इतर दिवशी रात्री १० वाजेपर्यंतची मर्यादा ठेवण्यात आली आहे. तसेच ध्वनिव्यवस्थेसाठी चार बेस आणि चार टॉपची मर्यादा निश्चित करण्यात आल्याचे वृत्त आहे. याच धर्तीवर जालन्यातही स्थानिक परिस्थिती, कायदा-सुव्यवस्था, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आणि न्यायालयीन निर्देश लक्षात घेऊन मर्यादित वेळ, मर्यादित उपकरणे, ध्वनीची निश्चित मर्यादा, संवेदनशील व शांतता क्षेत्रांपासून अंतर आणि पूर्वपरवानगी अशा अटी घालून नियंत्रित परवानगी देता येईल का, याचा प्रशासनाने विचार करावा, अशी मागणी डीजे व्यावसायिकांकडून होत आहे. दरम्यान, डीजेला परवानगी देण्याची मागणी करताना ध्वनीप्रदूषणाच्या नियमांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अलीकडेच राष्ट्रीय हरित लवादाने पुणे व पिंपरी-चिंचवडसह राज्यातील शांतता क्षेत्रांमध्ये ध्वनीप्रदूषण नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. शांतता क्षेत्रात ध्वनिवर्धक, संगीत उपकरणे किंवा मोठ्या आवाजातील कार्यक्रमांवर नियमांचे पालन आवश्यक आहे. त्यामुळे जालन्यात कोणताही निर्णय घेताना नागरिकांचे आरोग्य, रुग्णालये, शाळा, ज्येष्ठ नागरिक, रहिवासी भाग आणि शांतता क्षेत्रे यांचे संरक्षण हा केंद्रबिंदू राहणे आवश्यक आहे. त्याच वेळी नियम पाळण्यास तयार असलेल्या डीजे व्यावसायिकांसाठी कायदेशीर आणि व्यवहार्य रोजगाराचा मार्ग उपलब्ध होतो का, याचाही विचार होणे गरजेचे आहे.

गणेशोत्सव हा भक्ती, परंपरा आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. त्यामुळे उत्सवातील ध्वनीप्रदूषणाला मर्यादा घालणे आणि नागरिकांना त्रास होऊ न देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्याचवेळी मोठी गुंतवणूक करून व्यवसाय उभारलेल्या डीजे चालकांना आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कामगारांना पूर्णपणे उत्पन्नापासून वंचित ठेवण्याचा प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाही. म्हणून 'डीजे पूर्ण बंद' किंवा 'बिनधास्त डीजे' या दोन टोकांऐवजी कायद्याच्या चौकटीत नियंत्रित वापराचा तिसरा पर्याय उपलब्ध आहे का? याचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी पुढे येत आहे. ध्वनीची कमाल मर्यादा, उपकरणांची संख्या, वेळेची बंधने, संवेदनशील भागांमध्ये पूर्ण बंदी, पूर्वपरवानगी, ध्वनीमापन यंत्रणेद्वारे तपासणी आणि नियमभंग झाल्यास तत्काळ कारवाई अशा स्पष्ट अटी निश्चित करूनच कोणताही निर्णय घेतल्यास नागरिकांचे हित आणि डीजे व्यवसायिकांचा रोजगार या दोन्ही बाजूंमध्ये समतोल साधण्याचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो, अशी व्यावसायिकांची अपेक्षा आहे.

### रेल्वे प्रश्नांवर खासदार...

करणे तसेच जालनानगरसोल मनमाडपर्यंत वाढविणे, या मागण्यांवरही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच छत्रपती संभाजीनगरजालना दरम्यान नियमित //शटल सेवा सुरू करण्याबाबत व्यवहार्यता तपासून प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली. मराठवाड्यातील नागरिकांना मुंबई, पुणे, सूरत, अहमदाबाद, नागपूर, मडगाव, कोल्हापूर आणि नाशिकसह प्रमुख शहरांशी अधिक चांगली रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळावी, यासाठी नवीन रेल्वे सेवा व अतिरिक्त फेऱ्यांचा प्रस्ताव तयार करण्याची मागणीही त्यांनी केली.

गणेशोत्सवाच्या काळात मराठवाडाकोकण रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी नांदेडहडपसर गणपती विशेष रेल्वे सावंतवाडी रोडपर्यंत वाढविण्याची मागणीही खासदार डॉ. काळे यांनी यापूर्वी केली आहे.

**करमाडसह स्थानकांच्या विकासावर भर**

छत्रपती संभाजीनगर, मुकुंदवाडी, करमाड, बदनापूर आणि जालना रेल्वे स्थानकांवरील प्रवासी सुविधांचा स्वतंत्र आढावा घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. विशेषतः करमाड रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा आणि प्रवाशांच्या मागणीनुसार महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर व जालना रेल्वे स्थानकांवरील वाढता प्रवासी भार लक्षात घेऊन प्लॅटफॉर्म, लिफ्ट, एस्कलेटर, प्रतीक्षालय, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, पार्किंग, डिजिटल माहिती व्यवस्था आणि दिव्यांगांसाठीच्या सुविधांचा आढावा घेण्याची मागणीही करण्यात आली.

**रेल्वे सुरक्षा प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष**

मुकुंदवाडी गेट क्र. ५६ व्यतिरिक्त गेवराई रेल्वे स्टेशनजवळील देमणी शिवारशेवगावाडी परिसरातील पोल क्र. १४८/४ ते १४८/५ दरम्यान अंडरपास, तसेच जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील धोकादायक रेल्वे क्रॉसिंगचे सर्वेक्षण करून आवश्यक ठिकाणी / उभारण्याची मागणी खासदार डॉ. काळे यांनी केली.

**नवीन रेल्वे मार्ग व औद्योगिक विकासालाही प्राधान्य**

जालनाजळगाव (अजिंठा) नवीन रेल्वे मार्ग, जालनाखामगाव रेल्वे मार्ग तसेच छत्रपती संभाजीनगरअहिल्यानगर आणि धाराशिवबीडछत्रपती संभाजीनगर या प्रस्तावित रेल्वे मार्गांबाबत रेल्वे प्रशासनाच्या स्तरावरील सद्यस्थिती व पुढील कार्यवाहीची माहिती देण्याची मागणी करण्यात आली.

जालना औद्योगिक क्षेत्रातील स्टील उद्योगासह कृषी व व्यापारी क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन मालधक्का, पार्सल व लॉजिस्टिक सुविधा सक्षम करण्यावरही खासदार डॉ. काळे यांनी भर दिला.

**प्रत्येक विषयाचा देण्याची मागणी**

बैठकीदरम्यान खासदार डॉ. काळे यांनी केवळ आश्वासनांवर समाधान न मानता प्रत्येक प्रलंबित विषयाची सद्यस्थिती, प्रस्ताव कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, आवश्यक मंजुरी, पुढील कार्यवाही करणारा अधिकारी आणि अपेक्षित पूर्णता कालमर्यादा यांचा स्पष्ट तपशील मागितला. तसेच या सर्व विषयांबाबतचा () खासदार कार्यालयास उपलब्ध करून द्यावा आणि जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रेल्वे प्रश्नांवर दर तीन महिन्यांनी खासदाररेल्वे विभाग समन्वय आढावा बैठक आयोजित करावी, अशी मागणी त्यांनी केली. जनतेच्या दैनंदिन प्रवासाशी, सुरक्षिततेशी, रोजगाराशी, उद्योगाशी आणि पर्यटनाशी निगडित रेल्वे प्रश्नांना केवळ कागदोपत्री पाठपुराव्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांचे प्रत्यक्ष परिणाम दिसले पाहिजेत, या भूमिकेतून खासदार डॉ. कल्याण काळे यांनी नांदेड येथे रेल्वे प्रशासनासमोर जिल्ह्यातील प्रश्नांची प्रभावी मांडणी केली. त्यामुळे आता संबंधित प्रलंबित प्रस्तावांवर रेल्वे प्रशासनाकडून कोणती ठोस आणि कालबद्ध कार्यवाही केली जाते, याकडे जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### कायदा-सुव्यवस्था...

घेता यापुढे ही कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन विभागाने सांगितले आहे. पोलीस विभागाकडून १३ जणांकडून प्रतिबंधात्मक कारवाई

जालना जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासनानेही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई केली. भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १२६ अन्वये सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाच, तर तालुका जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीत आठ अशा एकूण १३ व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाईची नोंद करण्यात आली. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर समाजकंटकांवर कठोर नजर ठेवण्यात येत असल्याचे पोलीस विभागाने कळविले आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि महसूल विभागाच्या गौण खनिज शाखेच्या पथकांनी जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, परतूर, मंठा, अंबड व घनसावंगी तालुक्यांतील प्रमुख रस्ते आणि तपासणी नाक्यांवर दिवसभर गस्त व तपासणी केली. या मोहिमेत अवैध दारू वाहतूक तसेच अवैध वाळू किंवा मुरूम उत्खननाचा कोणताही गैरप्रकार आढळून आला नाही. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या कारवायांमुळे अवैध प्रवृत्तींना मोठा आळा बसला असल्याचे प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. वाहनधारकांनी क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करू नये. वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, परवाना व रिफ्लेक्टर अद्ययावत ठेवावेत. अवैध दारू, जुगार किंवा गौण खनिजांची अवैध वाहतूक अथवा उत्खनन निदर्शनास आल्यास नागरिकांनी तातडीने प्रशासनाला माहिती द्यावी. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे आणि शांतता भंग करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई यापुढेही सुरू राहील, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

### मराठवाडा मुक्तिसंग्राम...

तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा पुरस्कार वितरण सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय मार्गदर्शनपर कार्यक्रमातून मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास, त्यातील महत्त्वाच्या घटना आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदान याबाबत माहिती देण्यात येणार आहे.

या विशेष प्रचार कार्यक्रमास रोहिलागड परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### वाढदिवसाचा वायफळ...

पावसाची प्रार्थना करताना शहरातील नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली. या उपक्रमाला शिवसेनेचे युवा नेते व राज्यसचिव अभिमन्यू खोतकर, युवा नेते तथा नगरसेवक अश्विन आंबेकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, बाला परदेशी, शहर संघटक दिनेश भगत, घनश्याम खाकीवाले, तुलसीराम, विजय सेनानी, अर्जुन फते, लष्करी, विकी, जीवन भगत, सुनील भगत, प्रद्युम्न विजयसेनानी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी जालना शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संगीता राजे, शहरी आरोग्य कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. दीपक भालेराव, वैद्यकीय अधिकारी डॉ. माधुरी साबळे, डॉ. अश्विनी राठोड, डॉ. केशव शिंदे, डॉ. रेणुका काळे, स्टाफ नर्स पूजा पाटील, आरोग्य सेवक () सिद्धार्थ पवार, परिचारिका लता ताई शिंदे, प्रयोगशाळा वैज्ञानिक दीपक खिलारे, रक्तवाहक () विजय आढे, एस.यू. तुपे, निकळजे सिस्टर तसेच आशा सेविका सविता बायस, मंगल वानखेडे, शिला सिरसट, भारती हिवाळे, अर्चना घाटेकर, पुष्पा सदावर्ते, साधना डोईफोडे, सुनीता पटोळे आदींनी शिबिरात सेवा बजावली.

शिबिरामध्ये केवळ तपासण्या न करता नागरिकांना आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शनही करण्यात आले. रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन तसेच इतर तपासण्यांमधून आरोग्यविषयक समस्या वेळीच लक्षात येण्यास मदत होते. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी करण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. गणेशोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेचा उपक्रम राबविण्यात आल्याने प्रभागातील नागरिकांनी आयोजकांचे कौतुक केले. वाढदिवसाचा आनंद स्वतःपुरता मर्यादित न ठेवता तो नागरिकांच्या आरोग्याशी जोडण्याचा प्रयत्न या शिबिरातून करण्यात आला.

### समान काम...

तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.मागण्या मंजूर न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवत अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारला जाईल,अशी भूमिका जालना जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने घेतली आहे. पत्रावर संघटनेचे अध्यक्ष कल्याणराव टेपले यांची स्वाक्षरी आहे.

**कामाचा वाढता ताण; कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्या**

न्यायालयीन कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, रिक्त पदे आणि वाढलेले खटले यामुळे कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार ५०० खटल्यांसाठी एक न्यायालय स्थापन करण्याची आवश्यकता असतानाही पुरेशा न्यायालयांची स्थापना न झाल्यामुळे प्रत्येक न्यायालयात मोठ्या प्रमाणात खटले प्रलंबित राहत आहेत, असा दावा पत्रात करण्यात आला आहे.याचा परिणाम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या कामावर होत असून, वाढलेल्या कामाच्या प्रमाणाच्या तुलनेत मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना समान कामासाठी समान वेतन मिळावे, या मागणीसाठी आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**टप्प्याटप्प्याने होणार आंदोलन**

संघटनेने आंदोलनाचा कार्यक्रमही जाहीर केला आहे. त्यानुसार १६ सप्टेंबर २०२६ रोजी काळ्या फिती लावून काम करण्यात येणार आहे. त्यानंतर १६ व १७ ऑक्टोबररोजी दोन दिवस काळ्या फिती लावून काम केले जाणार आहे.मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यास ५ नोव्हेंबर रोजी एक दिवस सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहे. त्यानंतरही मागण्या मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून राज्यभरातील दुय्यम न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे.

### प्रा. श्रीकांत चिंचखेडकर....

त्यामुळे पाठ्यपुस्तकातील विषय अधिक सहज आणि रंजक पद्धतीने समजण्यास मदत होत आहे. यासोबतच खगोलशास्त्राची स्वतंत्र मांडणी करण्यात आली आहे. भूगोल हा पृथ्वी, तिची रचना आणि तिच्यावर घडणाऱ्या नैसर्गिक व मानवी प्रक्रियांचा अभ्यास करतो, तर खगोलशास्त्रात पृथ्वीच्या पलीकडील सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, सूर्यमाला, आकाशगंगा आणि विश्वातील खगोलीय घटकांचा अभ्यास केला जातो. विद्यार्थ्यांना या दोन्ही विषयांचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी प्रदर्शनाची रचना करण्यात आली आहे. खगोलशास्त्र विभागातील दुर्बिणीच्या माध्यमातून आकाशीय घटकांचे निरीक्षण हे विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. प्रत्यक्ष निरीक्षणामुळे त्यांच्या मनात अवकाश, ग्रह-तारे आणि विश्वाविषयी प्रश्न निर्माण होत असून वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना मिळत आहे. प्रदर्शनातून पर्यावरण संवर्धनाचाही संदेश देण्यात आला आहे. टाकाऊ वस्तूंपासून विविध शैक्षणिक आणि कलात्मक प्रतिकृती तयार करून 'कचऱ्यातून ज्ञान आणि सर्जनशीलता' ही संकल्पना मांडण्यात आली आहे. निसर्गाचे महत्त्व, पर्यावरण संरक्षण आणि उपलब्ध साधनांचा कल्पक वापर याबाबतही जनजागृती करण्यात आली आहे.

प्रा. चिंचखेडकर यांनी यापूर्वी विज्ञान व गणित प्रयोगशाळा, भारतातील प्रसिद्ध स्थळे आणि विविध विषयांवरील शैक्षणिक प्रतिकृती असे अनेक उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता निरीक्षण, प्रयोग आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकावे, हा त्यांच्या शैक्षणिक कार्याचा केंद्रबिंदू आहे. गेल्या २३ वर्षांपासून कोणताही स्वार्थ न ठेवता ज्ञानाचा समाजोपयोगी प्रसार करण्याचे कार्य करणाऱ्या प्रा. चिंचखेडकर यांच्या या उपक्रमातून धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांसोबत शिक्षण, विज्ञान व पर्यावरण यांची सांगड घालण्यात आली आहे. हे भूगोल-खगोलशास्त्राचे शैक्षणिक प्रदर्शन विजयादशमी अर्थात दसऱ्यापर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी या उपक्रमाला सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत भेट देऊन प्रयोग व प्रात्यक्षिकांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी केले आहे.

### कुणबी जात...

झाला नाही. मंगळवारी प्राप्त सर्व ३३ अर्ज समिती प्रवर्गातील असून गॅझेट प्रवर्गात एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. या अर्जांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

### मराठवाडा मुक्ती...

सुशिक्षित बेरोजगारांना महागाई निर्देशांकाप्रमाणे भत्ता देण्यात यावा.

१०) मागेल त्याला सिंचन विहीर आणि जनावरांचा गोठा या योजना परतूर मतदार संघात प्राधान्याने राबवाव्यात.

११) आष्टी, को. हादगाव परिसरात वीज पुरवठ्याचे मोठे संकट असून आष्टी येथे १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारून वीज पुरवठा सुरळीत करावा.

१२) अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ आणि महात्मा फुले ओबीसी महामंडळांना निधी उपलब्ध नसल्याने तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा.

१३) परतूर आणि मंठा तालुक्यात प्रभारी गटविकास अधिकारी राजेश तांगडे आणि गगण बोने यांच्या काळात मनरेगा मध्ये झालेला पक्षपात,निकष डावलून अर्थपूर्ण व्यवहारातून लाभार्थ्यांची निवड, कामे न करता रस्त्यांची बीले अदा करणे, अर्थपूर्ण व्यवहारातून विहीरींना मान्यता व घरकुलाचे हप्ते अदा करतांना आर्थिक घेवाण या बाबतीत चौकशी समिती बसवून चौकशी करण्यात यावी.वरील मागण्या तात्काळ पूर्ण करण्यात याव्यात अन्यथा वंचीत बहुजन आघाडीच्या माध्यमातून पूढील काळात तीव्र आंदोलन करण्यात येईल व होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शासनावर राहील असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जालना पूर्वचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर ज्येष्ठ नेते चौखाजी नाना सौंदर्य, गौतम खंडागळे, डॉ.किशोर त्रिभुवन,दिपक हिवाळे,स्वप्निल पहाडे,शेख जमील, वंचितचे परतूर तालुका अध्यक्ष हनुमंत मोरे,सुभाष जाधव तसेच असंख्य कार्यकर्त्यांच्या स्वाक्षरी आहेत.

### शासकीय योजनांचा ...

पोहोचविण्यात येणार आहे. कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांच्या योजनांचा यात समावेश असेल. कृषी क्षेत्रातील शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान तसेच महिला बचत गट आणि महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात येईल. विद्यार्थी व युवकांसाठी उच्च शिक्षण, शिष्यवृत्ती, विविध शैक्षणिक योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम तसेच स्वयंरोजगार व कर्ज योजनांची माहितीही या उपक्रमातून देण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. सहभाग व सहकार्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वाचन संस्कृती...

बैजल यांनी विद्यार्थ्यांना 'वाचाल तर वाचाल' हा प्रेरणादायी संदेश देत जीवनात वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले. नियमित वाचनामुळे ज्ञान वाढते, विचारांना दिशा मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे त्यांनी सांगितले. प्रसिद्ध लेखिका रेखा बैजल यांनी ज्ञानग्रहणासाठी केवळ वाचन पुरेसे नसून वाचलेल्या साहित्याचे मनन आणि चिंतनही आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ वाचनासाठी राखून ठेवावा आणि विविध विषयांवरील पुस्तके वाचण्याची सवय लावून घ्यावी, असे आवाहन करून त्यांनी या शाळेचा इयत्ता चौथीचा आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी आदित्य मस्कर हा शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्याबद्दल सौ. बैजल यांनी पुढील शिक्षणासाठी रोख स्वरूपात पाच हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. परीक्षेच्या दोन महिने अगोदर त्याचे वडील मयत झाले होते. तरीदेखील त्याने मिळवलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या. संजयकुमार मुथा यांनी नव्याने सुरू झालेल्या ग्रंथालयाचा विद्यार्थ्यांनी अधिकाधिक उपयोग करून घ्यावा, असे सांगितले. यावेळी मनोगत व्यक्त करताना मुख्याध्यापिका गीता पोरवाल यांनी विद्यार्थ्यांनी 'वाचन कट्टा' आणि 'कुसुमाग्रज ग्रंथालय' यांचा नियमित वापर करून वाचनाची सवय जोपासावी आणि त्यातून आपले ज्ञान समृद्ध करावे, असे आवाहन करून उपस्थितांचे आभार मानले. यावेळी जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या हेमलता पेम्बारती, सतीश काळे, रमेश आपुट, लक्ष्मी यादव, प्रिया टापर, सांची भुरेवाल, उज्वला खंदारे, कल्याणी दळवी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या पर्यवेक्षिका मीरा मोहिते यांनी केले.

# सेवा संकल्पातून लोकाभिमुख प्रशासन महिनाभराचा उपक्रम ; प्रशासन जनतेच्या दारी

'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. प्रशासन १७ सप्टेंबरपासून अशाच एका लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.हे अभियान म्हणजे केवळ कार्यक्रमांची मालिका नाही. सरकारी सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ नेण्याचा हा प्रयत्न आहे.

**कार्यालयाच्या फेऱ्या कमी होणार**

गावातील एखाद्या नागरिकाला प्रमाणपत्र हवे असते, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असते किंवा एखाद्या कुटुंबाला सरकारी योजनेचा लाभ घ्यायचा असतो. अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये जावे लागते. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे.

प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

**शिबिरांच्या माध्यमातून कामांना गती**

या शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सोप्या भाषेत सांगायचे तरज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या अभियानातून होणार आहे.

**गावात सेवा, गावातच समाधान**

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यात सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

**शासनाची सेवा, समाजाचा सहभाग**

याचा अर्थ एकचशासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो.ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे.

**अंगणवाडीतही सेवा उत्सव**

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे




कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याची तरतूद आहे. ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता आई, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

**गावातील तरुणांच्या कल्पनांना नवे व्यासपीठ**

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा**

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

**लाभार्थ्यांच्या घरापर्यंत 'आशीर्वादाचा दिवा**

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.सरकारची योजना कागदावर असते; पण तिचा लाभ जेव्हा एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला जोडणारा हा उपक्रम आहे.

**बदलाची गोष्ट आता गावागावातून**

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते.

म्हणूनच 'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रीलसच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

**सेवा संकल्पाची खरी दिशा**

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहेसामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**
**९७०२८५८७७७**

---

# मला लाज वाटते, असे म्हणण्याची वेळ का आली?

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ मागील १७ वर्षांपासून तयार होतो आहे.केंद्रीय सार्वजनिक बांधकाम मंत्री नितीन गडकरी यांनी अनेक वर्षांपासून अनेक रस्त्याचे बांधकाम पूर्ण करण्याच्या तारखा जाहीर केल्या.गुरुवारी गोव्यात बोलताना उघडपणे नाराजी व्यक्त केली.मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाला झालेल्या निलंबनाची मला लाज वाटते.असे म्हणण्याची वेळ का आली.रस्ता लवकर बांधून पूर्ण व्हावा म्हणून स्थानीक नागरीकांनी आंदोलने केली, तालुका निहाय पत्रकार संघाच्या पत्रकारांनी आंदोलने केली.तरीही परिस्थिती जेसे थे आहे.गडकरी कधी म्हणाले स्थानिक लोकप्रतिनिधी कंत्राटदारांना आडवे येतात त्यांची मी नावे जाहीर करीन पण एवढ्या वर्षात नावे जाहीर केली नाहीत.गडकरी महाराष्ट्रातील मोठे नेते आहेत.

त्यांच्या बोलण्यावर जनता विश्वास ठेवून होती.पण त्यांची आश्वासने पूर्ण झाली नाहीत.रस्ता बांधकाम पूर्ण झाले नसताना टोल नाकी तयार झाली.मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्ग तयार करण्यात आधी ह्या परिसरात वन संपत्ती होती.मोठ - मोठे दगड होते,माती होती.त्यांचे मूल्य शासनाच्या तिजोरीत जमा झाले.असे असताना टोल नाकी का हवी.कंत्राटदार हा काही लेचापेचा नसतो.कामापोटी शासनाकडे अनामत रक्कम जमा करतो.कोकण विकास हा या रस्त्यात दडलेला आहे.म्हणून जाणीव पूर्वक हेटाळणी केली जाते आहे का असा प्रश्न पडतो.

कोकणातील निसर्ग हाच कोकणाचे वरदान आहे.मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गा नंतर हाती घेतलेले प्रकल्प सुरू झाले.

मग, कोकणातील गणेशोत्सव खाचखळग्यातूनच साजरा व्हावा असे वाटते का? २५ लाखांहून अधिक लोक गणेशोत्सवात कोकणात आले रस्त्यावरचे अडथळे दूर करून.गडकरींची हतबलता बरेच काही सांगून जाते.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

---

# जिल्ह्यात पंडित दीनदयाळ उपाध्याय 'विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ' चे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रोजगार इच्छुक सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना यांच्या वतीने दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत जिल्ह्यातील १५ नामांकित महाविद्यालये व संस्थांमध्ये एकाच वेळी ''पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ'' आयोजित करण्यात आले आहे. या रोजगार महाकुंभामध्ये २००० पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध असून, ४० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या व नियोक्ते सहभागी होणार आहेत. सहभागी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

या रोजगार महाकुंभामध्ये दहावी, बारावी, विविध पदवीधर, आयटीआय ट्रेडधारक तसेच विविध शैक्षणिक पात्रता व कौशल्य असलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. यामध्ये ह्युमन रिसोर्सेस अफिसर, फील्ड असिस्टंट, मॅनेजर, अप्रेंटिस ट्रेनी, असिस्टंट ब्रांच मॅनेजर, संगणक ऑपरेटर, अप्रेंटिस, सेल्स एक्झिक्युटिव्ह, सर्व्हिस ॲडव्हायझर, असिस्टंट टेक्निशियन, फिटर, वेल्डर, सुरक्षा रक्षक, सेल्स एक्झिक्युटिव्ह, डेव्हलपमेंट मॅनेजर, सर्विस सुपरव्हाझर इत्यादी पदांचा समावेश आहे.

---

# प्रारूप मतदार यादीत आपले नाव तपासून नाव नसल्यास नमुना क्रमांक ६ भरुन मतदार नोंदणी करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण - २०२६ कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव आहे किंवा नाही याची तपासणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. नागरिकांना आपले नाव मतदार यादीत तपासण्यासाठी ... या संकेतस्थळावर मतदार ओळखपत्र क्रमांक, वैयक्तिक माहिती किवा मोबाईल क्रमांकाच्या माध्यमातून शोध घेता येईल. तसेच ... या संकेतस्थळावर प्रारूप मतदार यादी स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप मतदार यादीत नाव नसल्यास नमुना क्रमांक ६ भरा. प्रारूप मतदार यादीमध्ये आपले नाव नसल्यास तसेच नवीन मतदार म्हणून नोंदणी करावयाची असल्यास नमुना क्रमांक ६ (घोषणापत्रासह) भरावा. हा अर्ज नागरिकांना ... या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲपद्वारे ऑनलाइन करता येईल. तसेच संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात अथवा संबंधित यांच्याकडे ऑफलाइन अर्ज सादर करता येईल,

**अर्ज स्वीकारण्यासाठी विशेष मोहीम**

मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून, खालील दिवशी नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा. सर्व मतदान केंद्रे, सर्व तहसिल कार्यालये, शाळा व कॉलेजेस येथे विशेष शिबिरांचे पुढील प्रमाणे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार १९ सप्टेंबर २०२६, रविवार २० सप्टेंबर २०२६,शनिवार २६ सप्टेंबर २०२६,रविवार २७ सप्टेंबर २०२६ या विशेष मोहिमेदरम्यान नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रावर अथवा नियुक्त यांच्याकडे संपर्क साधून मतदार नोंदणीसाठी अर्ज करावा.

**मतदारांनी आजच आपले नाव तपासावे**

मतदार यादीत नाव असणे ही मतदानाच्या अधिकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

---

# चंदनझिरा सुंदरनगर नागेवाडी येथे शासकीय रुग्णालय उभारणीसाठी जागेची पाहणी

## आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला गती

**जालना - प्रतिनिधी**

चंदनझिरा परिसरातील सुंदरनगर नागेवाडी येथे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे, यासाठी शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. या पार्श्वभूमीवर आज आमदार अर्जुनराव खोतकर यांनी प्रस्तावित शासकीय रुग्णालयासाठीच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी केली.चंदनझिरा परिसराचा वाढता विस्तार, वाढती लोकसंख्या तसेच परिसरातील नागरिकांची आरोग्य सुविधांसाठी होणारी गैरसोय लक्षात घेता सुंदरनगर नागेवाडी येथे शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत आमदार खोतकर यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याचाच एक भाग म्हणून आज प्रस्तावित जागेची पाहणी करण्यात



आली. हे आरोग्य अभियान अंतर्गत निधी मंजुरीनंतर जागेचा प्रश्नही आमदार खोतकर यांनी सोडवलायापूर्वी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नातून नागरी मधुन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, महानगरपालिकेच्या स्तरावरील उदासीनतेमुळे मंजूर झालेला निधी शासनाकडे परत करण्याची नामुष्की मनपावर आली होती. त्यानंतरही आमदार खोतकर यांनी हा विषय सोडून न देता पुन्हा पाठपुरावा करून नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी निधी मंजूर करून आणला.निधी मंजूर झाल्यानंतर आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेल्या जागेचा प्रश्नही निर्माण झाला होता. आमदार खोतकर यांनी या प्रश्नात स्वतः जातीने लक्ष घालून जागेची अडचण दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे आता आरोग्य केंद्राच्या कामाला पुढील गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. चंदनझिरा, नागेवाडी, आयेशानगर, एमआयडीसी परिसराला लाभसुंदरनगर नागेवाडी येथे शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्यानंतर चंदनझिरा, नागेवाडी, आयेशानगर, एमआयडीसी तसेच लगतच्या परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. स्थानिक पातळीवरच प्राथमिक तसेच आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, उपचारासाठी नागरिकांना दूरवर जाण्याची गरज कमी होणार आहे.

आज झालेल्या पाहणीदरम्यान आमदार अर्जुनराव खोतकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रस्तावित जागेबाबत माहिती घेतली. आरोग्य केंद्राच्या उभारणीसाठी आवश्यक बाबी, जागेची उपलब्धता आणि पुढील कार्यवाही याबाबतही चर्चा करण्यात आली.दरम्यान, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ( )आरोग्य केंद्रासाठी ०निधी मंजूर करून आणण्यापासून ते जागेची अडचण दूर करण्यापर्यंत आमदार खोतकर यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. परिसरातील नागरिकांचा आरोग्य सेवेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे मनःपूर्वक आभार मानले.या पाहणीप्रसंगी *शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, जालना जिल्हा शल्यचिकित्सक () डॉ. राजेंद्र पाटील, विठ्ठल भाऊ दैने, संतोष रासवे, राधा किसान दाभाडे, नगरसेवक सुनील बोर्डे, नगरसेवक माजीद पठाण, नगरसेवक अनिल तिरुखे, आनंद धोत्रे* यांच्यासह परिसरातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

# सेवा संकल्प’ अभियानातून गावागावात पोहोचणार शासकीय योजनांचा संदेश

## संदेश ज्योती, विद्यार्थ्यांच्या प्रभात फेऱ्या, सेवा सेतू शिबिरे व विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकीर्दीनिमित्त तसेच शासनाच्या विविध सेवा व लोककल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत जलदगतीने पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून गावागावात ‘संदेश ज्योती’, विद्यार्थ्यांच्या प्रभात फेऱ्या, सेवा सेतू शिबिरे तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी दिली. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेत विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे, प्रकल्प संचालक सुशील कुमार पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, कक्ष अधिकारी राधाकिसन राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच तालुकास्तरीय अधिकारी



ऑनलाइन माध्यमातून बैठकीत सहभागी झाले.

**नागरिकांना योजनांचा थेट लाभ**

‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत जिल्हा व प्रत्येक तालुकास्तरावर ‘सेवा सेतू शिबिरे’ आयोजित करण्यात येणार आहेत.

या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांचा थेट लाभ मिळवून देणे, विविध विभागांतील प्रलंबित कामांचा गतीने निपटारा करणे तसेच नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

**नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन**

अभियानात ‘नाविन्यपूर्ण संकल्पना’ मांडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज, ‘सेवा माझे योगदान’, स्वच्छता मोहीम यांसह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत नागरिकांचा सहभाग वाढवून शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि त्यांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**उद्दिष्टपूर्तीसाठी समन्वयाने काम करा**

अभियानाचा कालावधी निश्चित असल्याने सर्व विभागांनी आपापली उद्दिष्टे वेळेत पूर्ण करावीत. अभियानातील प्रत्येक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे आणि ‘सेवा संकल्प अभियान’ यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया यांनी केले आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी जालना जिल्ह्यात मंगळवारी ३३ अर्ज प्राप्त;आतापर्यंत २३७ अर्ज प्राप्त

**जालना - प्रतिनिधी**

कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात दि. १५ सप्टेंबर रोजी आयोजित १३ शिबिरांमध्ये एकूण ३३ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २३७ एवढे अर्ज प्राप्त झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जालना जिल्ह्यात दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात जालना व बदनापूर तालुक्यांत चार, अंबड व घनसावंगी तालुक्यांत तीन, भोकरदन व जाफराबाद तालुक्यांत तीन तसेच परतूर व मंठा तालुक्यांत तीन, अशी एकूण १३ शिबिरे आयोजित करण्यात आली. जालना तालुक्यात तीन शिबिरात १९ अर्ज, भोकरदन तालुक्यात दोन शिबिरांत तीन अर्ज, जाफराबाद तालुक्यात एका शिबिरात पाच अर्ज, तर परतूर तालुक्यात दोन शिबिरांत सहा अर्ज प्राप्त झाले. बदनापूर, अंबड, घनसावंगी आणि मंठा तालुक्यात आयोजित शिबिरांमध्ये एकही अर्ज प्राप्त (पान २ वर)

# विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, शिक्षकांनी २१ सप्टेंबरच्या बैठकीत सहभागी व्हावे

## सहआयुक्त मंजूषा मिसकर यांच्या सूचना; आठही जिल्ह्यांतून अभिप्राय संकलनाला वेग

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणा अधिक परिणामकारक करण्यासाठी विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था व संबंधित घटकांनी आपल्या सूचना व अनुभव मांडावेत. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात होणाऱ्या बैठकीत जास्तीत जास्त संबंधितांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी केले. याअनुषंगाने आज विभागीय आयुक्त कार्यालयात सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी विभागातील आठही जिल्ह्यांतील टास्क फोर्सचे नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. या बैठकीस विभागीय माहिती कार्यालयाचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके उपस्थित होते. बैठकीत प्राप्त सूचना व अभिप्रायांचे वर्गीकरण, संबंधितांना भेटीसाठी वेळ देणे आणि २१ सप्टेंबरच्या बैठकीसाठी आवश्यक व्यवस्थेबाबत सूचना देण्यात आल्या. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड व हिंगोली या आठ जिल्ह्यांतील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, अभ्यासिका चालक व शैक्षणिक संस्थांनी भरती परीक्षेचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊन ठोस सूचना द्याव्यात, असे मिसकर यांनी सांगितले.

१८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांत विशेष कक्ष कार्यरत राहणार आहेत. नागरिकांना या कक्षात सूचना, शिफारशी, हरकती व निवेदने सादर करता येतील. प्रत्यक्ष उपस्थित राहता न येणाऱ्यांनी -.. (सीएसएन-एग्झाम रिफॉर्म्स टास्क फोर्स ॲट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इन) या ई-मेलवर अभिप्राय पाठवावा. प्राप्त ई-मेल व निवेदनांचे १७ सप्टेंबरपर्यंत वर्गीकरण करून १८ व १९ सप्टेंबर रोजी संबंधितांना भेटीसाठी वेळ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन स्मार्ट सिटी कार्यालयात नोंदणी, टोकन, गटनिहाय प्रवेश, आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी, चहापान व सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करण्याच्या सूचनाही मिसकर यांनी दिल्या. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकालापर्यंतची प्रक्रिया, प्रश्नपत्रिकेची सुरक्षितता, परीक्षा केंद्र व्यवस्थापन, डिजिटल व बायोमेट्रिक प्रणाली, सीसीटीव्ही, मूल्यांकन, तक्रार निवारण तसेच पेपरफुटी व गैरप्रकारांना प्रतिबंध याबाबतही सूचना अपेक्षित आहेत. भरती परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि परीक्षा क्षेत्रातील जाणकारांचा प्रत्यक्ष अनुभव सुधारणा प्रक्रियेत महत्त्वाचा असल्याने २१ सप्टेंबर रोजी स्मार्ट सिटी कार्यालयात होणाऱ्या बैठकीस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी केले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी जालना जिल्ह्यासह मराठवाडा दुष्काळग्रस्त जाहीर करा - वंचित बहुजन

**परतूर - प्रतिनिधी**

१७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आहे. या दिनाचे औचित्य साधून मराठवाड्यातच मंत्रीमंडळ बैठकीचे आयोजन करून विभागातील भीषण दुष्काळी परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा दुष्काळग्रस्त जाहीर करून तात्काळ उपाययोजना लागू कराव्यात, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.मराठवाड्यात यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने शेतीचे आतोनात नुकसान झाले आहे. सोयाबीन, मूग, उडीद, कापूस, तूर, ऊस ही पिके पाण्याअभावी करपून गेली आहेत. पिण्याच्या पाण्याचा



आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून विहिरींनी तळ गाठला आहे. या पार्श्वभूमीवर परतूर विधानसभा मतदार संघासह जालना जिल्ह्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख मागण्या अशा :

१) शेतकऱ्यांना हेक्टरी ५०,००० रुपये विनाअट मदत द्यावी. सर्वत्र पिके करपली असल्याने पंचनाम्याचा फार्स करू नये व १०० टक्के पीक विमा भरपाई देण्यात यावी.

२) चारा छावण्या तात्काळ सुरू कराव्यात आणि त्या शासकीय संस्थांकडूनच चालवाव्यात. राजकीय पदाधिकाऱ्यांच्या संस्थांना छावण्या दिल्यास मोठे गैरप्रकार होतात.

३) मंठा-परतूर-नेर-सेवली विधानसभा मतदार संघासाठी पांढरा हत्ती ठरलेली १७३ गाव वॉटरग्रीड योजना केवळ पैसा जिरवणारी ठरली आहे. जनता आजही पाण्यासाठी त्रस्त आहे. या योजनेची स्वतंत्र समिती नेमून पारदर्शी चौकशी करण्यात यावी.

४) मतदार संघातील तीव्र पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रत्येक गावात टँकरची व्यवस्था करण्यात यावी.

५) रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून रोजगार हमी योजनेची कामे तात्काळ सुरू करावीत व ती कामे मजुरांद्वारेच करण्यात यावीत. अनेक ठिकाणी नावे मजुरांची आणि कामे यंत्राने होत असल्याने कडक कारवाई करावी. ६) कर्जवसुलीला स्थगिती देण्यात यावी.

७) विद्यार्थ्यांची ट्युशन फी, परीक्षा फी व इतर फी माफ करण्यात यावी.

८) शेतीपंपाच्या वीज बिलांमध्ये माफी देण्यात यावी.

९) (पान २ वर)

# जे ई एस महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

**जालना - प्रतिनिधी**

ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल जालना येथे झालेल्या जिल्हास्तरीय वुशू क्रीडा स्पर्धेत १२वी वाणिज्य वर्गातील स्पर्धक कु.रितू संजय लोदवाल हिने ७५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला तसेच १२ वाणिज्य वर्गातील कु.चंचल बाबासाहेब डोके हिने ४५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला.ह्या स्पर्धकांची विभागीय क्रीडा स्पर्धेत निवड झाल्याबद्दल जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया,संस्थेचे सचिव श्रीनिवासजी भक्कड, प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री,उपप्राचार्य डॉ.उमेश मोगले,रजिस्ट्रार बाबाजी सोळुंके आदींनी अभिनंदन केले तर कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य एस बी बिक्कड



,पर्यवेक्षक डी एम धनवे, पर्यवेक्षक एफ एम मोहिते, डॉ. हेमंत वर्मा,डॉ.किशोर बिरकायलू,सचिन निसर्गन,क्रीडा शिक्षक प्रा.राहुल सारस्वत यांनी मार्गदर्शन केले.

# शासकीय योजनांचा जागर:श्रीगणरायाच्या चरणी ‘लोकसंवाद’ची ओवाळणी

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

गणराय ही खऱ्या अर्थाने लोकदेवता. गणरायाच्या आगमनाच्या निमित्त निर्माण झालेल्या चैतन्यमयी वातावरणात शासनाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याची संधी साधून शासकीय योजनांचा जागर करुन लोकसंवादाची ओवाळणी गणरायाच्या चरणी अर्पण करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यात ‘लोकसंवाद-२०२६’ हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे.

बुधवार दि. १६ ते २४ सप्टेंबर या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही जिल्हा प्रशासनाच्या वतीने या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

लोकसंवाद-२०२६’च्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागांच्या योजना, त्यांचे लाभ, पात्रतेचे निकष तसेच नागरिकांसाठी उपयुक्त माहिती जनतेपर्यंत (पान २ वर)

# जालन्यात संवत्सरी पर्वाचा संदेश; अहंकार सोडा, क्षमा करा - बाल न्याय मंडळाच्या सदस्या ॲड. अश्विनी धन्नावत यांचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जैन धर्मीयांचा सर्वात मोठा क्षमापना पर्व संवत्सरी आज सर्वत्र भक्तीभावाने साजरा होत आहे. खामेमि सव्वे जीवा, सव्वे जीवा खमंतु मे, मित्तिमे सव्व भूएसु, वेरं मज्झं न केणई या महामंत्राने आज संपूर्ण जालना शहरात क्षमा आणि मैत्रीचा संदेश घुमत आहे. या पार्श्वभूमीवर बाल न्याय मंडळाच्या सदस्या तथा विधिज्ञ ॲड. अश्विनी धन्नावत यांनी समाजाला अहंकार त्यागून क्षमेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. ॲड. धन्नावत म्हणाल्या की, ‘‘मिच्छामि दुक्कड़म् याचा अर्थ आहे - माझ्याकडून जाने-अनजाने घडलेले सर्व वाईट कर्म, चुका निष्फळ होवोत आणि मी मनापासून तुमची क्षमा मागते. आज मी कोर्टात आणि बाल न्याय मंडळात काम करताना पाहते, तर लक्षात येते की ९० टक्क्यांहून अधिक वादाचे मूळ कारण मालमत्ता किंवा पैसा नसून केवळ अहंकार असतो. मीच बरोबर, माझंच खरं हा अहंकारच नाती तोडतो. त्यांनी विशेषतः पालकांना आवाहन करताना सांगितले की, ‘‘बाल न्याय मंडळाच्या सदस्या म्हणून माझा अनुभव आहे की, मुलं तेच शिकतात जे ते घरात पाहतात. जर पालक एकमेकांवर राग धरून बसले, क्षमा मागितली नाही, तर मुलांमध्येही सूड आणि हट्टीपणाची भावना वाढते. म्हणून या संवत्सरीला पालकांनी मनाचा मोठेपणा दाखवून सर्वांना क्षमा करावी आणि क्षमा मागावी. जेणेकरून आपल्या मुलांमध्येही क्षमा करण्याचा आणि चूक मान्य करण्याचा चांगला संस्कार रुजेल. हाच संस्कार त्यांना भविष्यात एक चांगला नागरिक बनवेल. शेवटी त्यांनी सर्व जालनेकरांना मिच्छामि दुक्कड़म् म्हणत संवत्सरीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी जालना जिल्ह्यात मंगळवारी ३३ अर्ज प्राप्त; आतापर्यंत २३७ अर्ज प्राप्त

**जालना - प्रतिनिधी**

कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जिल्ह्यात दि. १५ सप्टेंबर रोजी आयोजित १३ शिबिरांमध्ये एकूण ३३ अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २३७ एवढे अर्ज प्राप्त झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्र वितरणासाठी जालना जिल्ह्यात दि. १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात जालना व बदनापूर तालुक्यांत चार, अंबड व घनसावंगी तालुक्यांत तीन, भोकरदन व जाफराबाद तालुक्यांत तीन तसेच परतूर व मंठा तालुक्यांत तीन, अशी एकूण १३ शिबिरे आयोजित करण्यात आली. जालना तालुक्यात तीन शिबिरात १९ अर्ज, भोकरदन तालुक्यात दोन शिबिरांत तीन अर्ज, जाफराबाद तालुक्यात एका शिबिरात पाच अर्ज, तर परतूर तालुक्यात दोन शिबिरांत सहा अर्ज प्राप्त झाले. बदनापूर, अंबड, घनसावंगी आणि मंठा तालुक्यात आयोजित शिबिरांमध्ये एकही अर्ज प्राप्त झाला नाही.

मंगळवारी प्राप्त सर्व ३३ अर्ज समिती प्रवर्गातील असून गॅझेट प्रवर्गात एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. या अर्जांवर तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# वाचन संस्कृती जोपासण्यासाठी राय लक्ष्मणप्रसाद बैंजल ट्रस्टचा पुढाकार

## जैन प्राथमिक विद्यालयात वाचन कट्टा उपक्रमाचे उद्घाटन

**जालना - प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या ज्ञानाची कक्षा व्यापक व्हावी आणि शालेय जीवनापासूनच वाचनाची सवय व संस्कृती रुजावी, या उद्देशाने जालना एज्युकेशन फाउंडेशन व राय लक्ष्मण प्रसाद बैजल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री महावीर स्थानकवासी जैन प्राथमिक विद्यालयात ‘वाचन कट्टा’ उपक्रम सुरू करण्यात आला. यासोबतच विद्यालयातील ‘कुसुमाग्रज ग्रंथालयाचे’ उद्घाटनही उत्साहात करण्यात आले.

‘वाचन कट्टा’चे उद्घाटन राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्टचे अध्यक्ष शिवकुमार बैजल आणि प्रसिद्ध लेखिका रेखा बैजल यांच्या





हस्ते झाले. तर ‘कुसुमाग्रज ग्रंथालयाचे’ उद्घाटन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे सचिव डॉ. धरमचंद गादिया यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा शिक्षण समितीचे अध्यक्ष विनोदकुमार मुथा होते. प्रमुख अतिथी म्हणून श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे उपाध्यक्ष भरतकुमार गादिया, सहसचिव कचरूलाल कुंकुलोळ, विश्वस्त डॉ. गौतमचंद रुणवाल, विश्वस्त संजयकुमार मुथा, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी, शालेय शिक्षण समितीचे कोषाध्यक्ष सुशीलकुमार बेगाणी, माध्यमिक विद्यालयाच्या डॉ. प्रतिभा श्रीपत, श्रीमती तिवारी, दिलीप केंद्रे, रुक्मिणीकांत दीक्षित, नरेंद्र जोगड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रा. लाहोटी यांनी प्रास्ताविकातून ‘वाचन कट्टा’ ’ या उपक्रमाची संकल्पना व उद्देश स्पष्ट केला. या उपक्रमांतर्गत लोकसहभागातून अनेक शाळांमध्ये ५० वाचन कट्टाचे उपक्रम राबविले जात आहेत. बैजल ट्रस्टच्या माध्यमातून १६ वाचन कट्ट्यांचे योगदान मिळाले आहे. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विविध प्रकारचे साहित्य वाचावे, त्यातून विचार करण्याची क्षमता विकसित करावी आणि ज्ञानाच्या नव्या वाटा शोधाव्यात, यासाठी हे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिवकुमार (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.